सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्रं.२.ची साक्ष
देवा शपथ खरे सांगेण की,

नाव : इकबाल इस्माईल शेख
वय : ५८ वर्षे, धंदा : व्यवसाय,
राहणार : शिवाजीनगर गावठाण पुणे.

**<u>सरतपास शपथेवर सरकारतर्फे सरकारी वकील श्रीमती कांबळे :-</u>**

१. मी फिर्यादीला ओळखतो. मी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षामध्ये अल्पसंख्यांक सेलचा अध्यक्ष म्हणून काम करतो व त्यामधून माझा फिर्यादीसोबत परिचय झाला. फिर्यादी देखील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला शहर उपाध्यक्ष आहेत.

२. मला फिर्यादीचा सोसायटीमधील घटनांबाबत नेहमी फोन यायचा. फिर्यादीला लॉकडाऊन कालावधीमध्ये इंटरनेट कनेक्शन घ्यायचे होते. फिर्यादीचा मुलगा व मुलगी आयटीमध्ये असल्यामुळे व त्यांना वर्क फ्रॉम होम असल्यामुळे इंटरनेटची आवश्यकता होती. त्याबाबत फिर्यादीने चौकशी केली असता सोसायटीमध्ये जीओ कंपनीची सेवा पुरविली जात होती. फिर्यादीने जीओ कंपनीसोबत संपर्क केला व सोसायटीच्या कार्यालयात देखील कळविले. फिर्यादीने सोसायटीच्या मागणीप्रमाणे लेखी पत्र देखील दिले. त्यावरुन फिर्यादीला भरपूर त्रास देण्यात आला. सोसायटीच्या बोर्डवर व सोसायटीच्या अॅपवर नोटीस पाठविण्यात आल्या. त्याबाबत फिर्यादीने सोसायटीचे सचिव यांचेसोबत चर्चा केली. सोसायटीच्या अध्यक्षांनी फिर्यादीचा फोन उचलला नाही. सोसायटीच्या सचिवांनी कोवीडचे कारण सांगून कनेक्शन घेता येत नसल्याचे फिर्यादीला सांगितले. सोसायटीचे सचिव व अध्यक्ष हे फिर्यादीसोबत अश्लील हावभाव करायचे व फिर्यादीच्या मागे फिर्यादी वॉकिंग करत असताना फिरायचे. तसेच ते फिर्यादीबाबत सोसायटीच्या वॉचमनकडे चौकशी करायचे. त्याबाबत फिर्यादीने पोलीस चौकीत तक्रार दिली. त्यावेळेस मी फिर्यादीसोबत होतो. घटनेबाबत पोलीसांनी माझ्याकडे चौकशी करुन माझे तपासटिपण नोंदवले. मी आरोपींना ओळखतो. आरोपी क्र. २ आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण .**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. निंबाळकर यांचेमार्फत -</u>**

३. हे म्हणणे खरे आहे की, पक्षाच्या कार्यकत्यांच्या तक्रारीप्रमाणे माझे सरकारी कार्यालयात येणे जाणे असते. हे म्हणणे खरे नाही की, महिला कार्यकत्यांच्या अडचणी सोडविण्यासाठीची जबाबदारी पक्षाने फिर्यादीवर दिलेली आहे. फिर्यादी महिला

शहर उपाध्यक्ष या नात्याने महिलांची कामे पाहतात अगर कसे याबाबत मी सांगू शकत नाही. माझे न्युज चॅनल नाही. दि. २८.०९.२०२० रोजी लेखी तक्रार अर्ज दिला होता. दि. २८.०९.२०२० रोजी मी फिर्यादीसोबत तक्रार देण्यासाठी कधी गेलो होतो त्या वेळेबाबत सांगू शकत नाही. फिर्यादीने कोवीडच्या नियमांचे उल्लंघन केल्याची माहिती फिर्यादीने मला दिली होती. साक्षीदार पुन्हा सांगतो की फिर्यादीने मला इंटरनेटच्या कनेक्शन बाबतच्या नोटीसीसंदर्भात माहिती दिली होती. सोसायटीची नोटीस आल्यानंतर घटनेबाबत माझी व फिर्यादीची काहीही चर्चा झाली नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीच्या सोसायटीमध्ये माझा प्लॅट नाही.

४. माझी मोसिना दिलावर कुरेशी यांचेसोबत ओळख नाही. मी चंद्रकांत लक्ष्मण खरात यांना ओळखत नाही. हे म्हणणे खरे आहे की, दयानंद गार्डन सोसायटीमध्ये कोणत्या कालावधीसाठी कोण अध्यक्ष व सचिव होते त्याबाबत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्यादीच्या सोसायटीमध्ये राहत नसल्यामुळे फिर्यादी व सोसायटीमध्ये नेमके कोणते वाद आहेत याची मला प्रत्यक्ष माहिती नाही. फिर्यादीने सोसायटीला इंटरनेट कनेक्शनचे संदर्भाने जे पत्र दिले होते त्याची प्रत मी पाहिलेली नाही. फिर्यादीने सोसायटीला इंटरनेट कनेक्शन घेण्यासंदर्भात पत्र दिले होते अगर कसे याची मला माहिती नाही व त्याबाबत मी सांगू शकत नाही. फिर्यादीच्या मुलीचे लग्न कोवीडच्या पूर्वी अगर नंतर झाले याबाबत मला सांगता येणार नाही. फिर्यादीची मुलगी तिच्या सासरी राहते अगर कसे याबाबत मी सांगू शकत नाही.

५. मी पोलीसांकडे तपासटिपण नोंदविताना फिर्यादीने मला सोसायटीच्या बोर्डवर व अॅपवर नोटीस पाठविल्या होत्या असे सांगितले होते. परंतु तसे तपासटिपणात का नोंद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. त्याचप्रमाणे मी पोलीसांकडे तपासटिपण नोंदविताना सोसायटीच्या सचिवांनी कोविडचे कारण सांगून कनेक्शन घेता येत नसल्याचे फिर्यादीला सांगितले हा मजकूर मी सांगितला नव्हता. मी पोलीसांकडे तपासटिपण नोंदविताना ते फिर्यादीबाबत सोसायटीच्या वॉचमनकडे चौकशी करायचे, त्याबाबत फिर्यादीने पोलीस चौकीत तक्रार दिली हा मजकूर सांगितला होता. परंतु तसा मजकूर तपासटिपणात का नमूद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही.

६. मी व फिर्यादी कौटुंबिक स्नेही आहोत. हे म्हणणे खरे नाही की, मी व फिर्यादी कौटुंबिक स्नेही असल्यामुळे फिर्यादीला खोट्या गुन्हयामध्ये मदत करण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने फिर्यादीत नमूद केल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, त्याबाबत फिर्यादीने चौकशी केली असता सोसायटीमध्ये जीओ कंपनीची सेवा पुरविली जात होती, फिर्यादीने जीओ कंपनीसोबत संपर्क केला व सोसायटीच्या कार्यालयात देखील

कळविले, फिर्यादीने सोसायटीच्या मागणीप्रमाणे लेखी पत्र देखील दिले, त्यावरुन फिर्यादीला भरपूर त्रास देण्यात आला, सोसायटीच्या बोर्डवर व सोसायटीच्या अॅपवर नोटीस पाठविण्यात आल्या, त्याबाबत फिर्यादीने सोसायटीचे सचिव यांचेसोबत चर्चा केली, सोसायटीच्या अध्यक्षांनी फिर्यादीचा फोन उचलला नाही, सोसायटीच्या सचिवांनी कोवीडचे कारण सांगून कनेक्शन घेता येत नसल्याचे फिर्यादीला सांगितले, सोसायटीचे सचिव व अध्यक्ष हे फिर्यादीसोबत अश्लील हावभाव करायचे व फिर्यादीच्या मागे फिर्यादी वॉकिंग करत असताना फिरायचे, तसेच ते फिर्यादीबाबत सोसायटीच्या वॉचमनकडे चौकशी करायचे, त्याबाबत फिर्यादीने पोलीस चौकीत तक्रार दिली, त्यावेळेस मी फिर्यादीसोबत होतो, हा संपूर्ण मजकूर मी खोटा कथन केला आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

समक्ष,

सहि/-

दिनांक : २९/१०/२०२५.

(अ.अ.कुलकर्णी)
३रे सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
लष्कर न्यायालय, पुणे.